# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक २४.०८.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

### (प्रशासकीय विषय)

**विषय क्रमांक २७ :-** वैद्यकीय आरोग्य अधिकारी गट "अ" पदोन्नतीस सर्व साधारण सभेची मंजुरी मिळणे बाबत.

**ठराव क्रमांक २७ :-** अमरावती महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी गट "अ" पदोन्नतीचे एकुण ३ पदे मंजुर आहे. मंजुर तीन पदांपैकी २ पदांवर वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून १ पद रिक्त आहे. या रिक्त पदावर सहा. वैद्यकीय अधिकारी संवर्गात श्रीमती प्रतिभा आत्राम, (खुला प्रवर्ग) सेवाज्येष्ठ आहेत.

सेवाज्येष्ठते प्रमाणे वैद्यकीय अधिकारी या पदांसाठी डॉ. प्रतिभा आत्राम, सहा. वैद्यकीय अधिकारी या पात्र ठरतात. पदोन्नती निवड समितीने डॉ. प्रतिभा आत्राम, सहा. वैद्यकीय अधिकारी यांना वैद्यकीय अधिकारी या रिक्त पदावर त्यांना वेतनश्रेणी S-२०:५६१००-१७७५०० मध्ये खुल्या प्रवर्गात पदोन्नती बाबत शिफारस केली. (पदोन्नती निवड समिती सभा दिनांक ०६/०७/२०२२) इतिवृत्तानुसार पदोन्नती निवड समिती सभा इतिवृत्तास मा. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांनी मंजुरी प्रदान केली आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीचे अनुषंगाने डॉ. प्रतिभा आत्राम, सहा. वैद्यकीय अधिकारी यांचे वैद्यकीय अधिकारी रिक्त पदावर खुल्या प्रवर्गात गट "अ" मध्ये पदोन्नतीस सर्व साधारण सभेची मंजुरी मिळणे बाबत प्रशासकीय विषय सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका,अमरावती

स्वा/-
प्रशासक,
महानगरपालिका,अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.